I0 प्रत

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** नांदेड **P.S.(ठाणे):** विमानतळ
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0255 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 04/07/2025 01:56

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** गुरूवार **Date From (दिनांक पासून):** 03/07/2025
**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 03/07/2025
**Time From (वेळेपासून):** 15:33 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:58 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 04/07/2025 **Time (वेळ):** 01:48 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 005
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 04/07/2025 01:48 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 02 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** समाजकल्याण कार्यालय, नांदेड,परिसरातील समतादुत प्रकल्प,बार्टी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

पोलीस स्टेशन, विमानतळ ★ नांदेड ★ सत्यमेव जयते

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** प्रज्ञा पंढरीनाथ घाडगे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1987

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | वैषाली नगर, तरोडा बु,ता जि नांदेड,विमानतळ,नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | वैषाली नगर, तरोडा बु,ता जि नांदेड,विमानतळ,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9766830109

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सुजाता मधुकरराव पोहरे | | | 1. एनडी 42 जे-2, 39/6, हडको ,नांदेड,विमानतळ,नांदेड, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दिनांक 03/07/2025

मी प्रज्ञा पंढरीनाथ घाडगे, वय 38 वर्षे, व्यवसाय टेलरींग, रा.वैषाली नगर, तरोडा बु., ता. जि. नांदेड. मोबाईल क्रमांक - 9766830109, आधार क्रमांक - 3563 2954 9102.

समक्ष पोलीस स्टेशन विमानतळ नांदेड येथे हजर येवून लेखी फिर्याद देते की, मी घटस्फोटीत असल्यामुळे वरिल ठिकाणी माझी आई, बहीण व माझा मुलगा नामे अंषु याचेसह राहते व टेलरींगचे काम करून कुंटुबाची उपजिवीका भागवते. दिनांक 26/06/2025 रोजी मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड येथे हजर येवून लेखी तक्रार दिली होती ती खालील प्रमाणे.

''मी दि.25/02/2025 रोजी माझा मुलगा नामे अंषु पंढरीनाथ घाडगे याचे पुढील शिक्षणासाठी अनुसुचीत जातीची जात पडताळणीकामी जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समीती नांदेड यांचेकडे ऑनलाईन अर्ज केला होता. त्यानंतर दि.13/03/2025 रोजी ऑफलाईन अर्ज केला होता. परंतु माझ्या मुलाचा अर्ज त्याचे वडीलाचे शाळेचे कागदपत्र सादर न केल्याने व इतर तांत्रीक कारणास्तव नामंजुर करण्यात आला होता. मी वरील नमुद अर्जातील त्रुटींची पुर्तता करून पुन्हा अर्ज ऑनलाईन अपलोड केला. त्यानंतर साधारण दोन महिन्यापुर्वी नक्की तारीख आठवत नाही. मी अपलोड केलेल्या कागदपत्राचा बंच घेऊन माझी सख्खी जाऊ नामे सुजाता पोहरे, जिल्हा प्रकल्प अधिकारी, समतादुत प्रकल्प (बार्टी), नांदेड हिस तिचे कार्यालयात जाऊन मुलाच्या जातपडताळणी कामासंबंधाने सांगीतले. तेंव्हा ती मला म्हणाली की, मी काम करत असलेल्या विभागाशेजारीच जात पडताळणी विभागाचे काम चालते त्यामुळे माझी तेथे ओळख आहे. मी तूझे काम करून देते. परंतू पैसे दिल्याषिवाय काम होणार नाही. त्यावर मी त्यांना पैसे कशासाठी लागतात असे विचारले. त्यावर तिने जात पडताळणी वैधता प्रमाणपत्र करणा-या संबंधीत समितीला पैसे दिल्याशिवाय तूझे काम होणार नाही, तूला पैसे द्यायचे नसतील तर तूझे काम होणार नाही, असे सांगीतले. त्यामुळे मी घाबरून किती पैसे लागतील असे विचारले असता, तिने मला सांगीतले 20,000/-रू. टोकन द्यावे लागेल. तेंव्हा मी तीला विचारले आणखी किती दयावे लागतील व कोणाला दयावे लागतील. तेंव्हा ती म्हणाली आणखी किती लागतील सांगता येत नाही असे उत्तर देऊन मला 20,000/-रू. लाच रक्कमेची मागणी केली आहे. त्यावर मी तिला माझे काम तू करणार आहेस का? असे विचारले. त्यावर तिने मला सांगीतले की, माझी जात पडताळणी कमिटीतील अधिकारी यांच्याशी ओळख आहे. मी त्यांना पैसे देवुन काम करून घेते.'' तरी माझी जाऊ सुजाता पोहरे ही मागत असलेली रक्कम ही लाच असल्याने तिचेवर कायदेशीर कार्यवाही व्हावी अशा आशयाची तक्रार दिली.

दिनांक 26/06/2025 रोजी सदर तक्रारीचे अनुषगांने श्री.करीमखान पठाण, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड यांनी त्यांचे कार्यालयात हजर असलेले दोन्ही पंच व सापळा पथकातील सर्व सदस्य यांचा एकमेकांना परिचय करून दिला होता. त्यानंतर मी पंचाना माझी तोंडी तक्रार सांगितली. त्यानंतर पो.नि. श्री.पठाण यांचेकडे मी दिनांक 26/06/2025 रोजी दिलेली लेखी तक्रार पंचाना वाचण्यास दिली. पंचानी तक्रार वाचुन मी दिलेली लेखी तक्रार व तोंडी सांगितलेली तक्रार एकसारखीच असल्याची खात्री करून सदर तक्रारीवर दोन्ही पंचानी व पो.नि. श्री.पठाण साहेबांनी सहया केल्या. नमुद तक्रारीवर मी यापुर्वीच सही केली होती.

त्यानंतर पो.नि. श्री.पठाण साहेबांनी लाच मागणी पडताळणीचा उद्देश सांगुन मला व दोन्ही पंचाना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर, मेमरी कार्ड बाबत माहिती दिली. त्यांचे सुचनेप्रमाणे पोकॉ जाधव यांनी पो.नि. श्री.पठाण, माझे व दोन्ही पंचांचे वक्तव्य डिजीटल व्हाईस रेकॉर्डरव्दारे एका नविन मेमरी कार्ड मध्ये ध्वनिमुद्रीत केले.

त्यावरून दिनांक 26/06/2025 रोजी लोकसेविका सुजाता पोहरे हे कार्यालयात हजर नसल्याने त्यांची भेट झाली नाही. त्यानंतर दिनांक 01/07/2025 रोजी लोकसेविका सुजाता पोहरे, जिल्हा प्रकल्प अधिकारी, समतादुत प्रकल्प (बार्टी), नांदेड यांची लाचमागणी पडताळणी करीता भेट घेतली. त्यावेळी त्यांनी फोनवर कोणाशीतरी

कामाविषयी बोलले व उदईक रोजी येण्यास सांगीतले.

त्यानंतर दि.03/07/2025 रोजी लाचमागणी पडताळणी कामी लोकसेविका सुजाता पोहरे, जिल्हा प्रकल्प अधिकारी, समतादुत प्रकल्प (बार्टी), नांदेड यांची समाजकल्याण कार्यालय, नांदेड परिसरातील त्यांचे कार्यालयात जावून समक्ष भेट घेवून लाच मागणी पडताळणी करण्याचे ठरविले. त्यानंतर मालटेकडी, नांदेड येथील रेल्वेब्रिज जवळ सापळा पथक थांबलेल्या ठिकाणा पासून वेळ 14.14 वा. मी व पंच क्रमांक 1 प्रकाश कल्याणपाड असे माझे कारने लाचमागणी पडताळणी करवाई करीता समाजकल्याण कार्यालय, नांदेड परिसरातील समतादुत प्रकल्प (बार्टी) येथे रवाना झालो. सदर ठिकाणी लोकसेविका सुजाता पोहरे यांची भेट घेतली असता, त्यांनी जात पडताळणी कमीटी यांचेशी बोलून तुम्हाला सांगते असे म्हणून बाहेर गेले. परंतू बराच वेळ आले नाही म्हणून आम्ही सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो. त्यानंतर वेळ 15:28 वाजता लोकसेविका सुजाता पोहरे यांचा कॉल माझे मोबाईल फोनवर आला. त्यांनी मला परत त्यांचे कार्यालयात येण्यास सांगीतले.

त्याप्रमाणे वेळ 15.33 वा. मी व पंच क्रमांक 1 प्रकाष कल्याणपाड असे माझे कारने लाचमागणी पडताळणी करवाई करीता समाजकल्याण कार्यालय, नांदेड परिसरातील समतादुत प्रकल्प (बार्टी) येथे परत रवाना झालो. मी समाजकल्याण कार्यालय, नांदेड परिसरातील समतादुत प्रकल्प (बार्टी) कार्यालयात लोकसेविका सुजाता पोहरे यांची त्यांचे कक्षात भेट घेवून माझे मुलाचे अनुसुचित जातीचे जात वैधता प्रमाणपत्र कामा संबंधाने चर्चा केली. त्यावेळी त्यांनी मला, तीस हजार रूपयेची मागणी केली, तेंव्हा स्टार्टीग ला किती? असे म्हणाले असता त्यांनी 'स्टार्टींग, एन्ड काही नाही, तुम्ही आता द्या, एक किंवा दोन दिवसात सही करून देतो म्हणायलेत' असे म्हणून माझेकडे लाचेची मागणी केली. परंतू मी त्यांना विनंती केली की, आता दहा, पंधरा हजार देते व राहीलेले नंतर देते. त्यावर लोकसेविका पोहरे यांनी लाच रक्कम स्विकारण्यास स्विकृती दर्शवली.

त्यानंतर मी व पंच क्रमांक 1 असे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी 16:10 वा. परत आलो. त्यानंतर पो.नि श्री पठाण यांनी मला व पंच क्रमांक 1 यांना लाचमागणी पडताळणी अनुशंगाने विचारपुस केली व डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये ध्वनिमुद्रित झालेले संभाषण पो.नि. श्री पठाण, दोन्ही पंच, सापळा पथक यांनी ऐकले. त्यात लोकसेविका सुजाता पोहरे यांनी माझे मुलाचे अनुसुचित जातीचे जात वैधता प्रमाणपत्राचे काम करून देण्याचा मोबदला म्हणून 30,000/- रूपये ज्यापैकी आता दहा, पंधरा हजार रूपये व ऊर्वरीत काम झाल्यावर अशी तडजोड करून लाच रक्कम स्विकारण्यास स्विकृती दर्शवुन लाचेची मागणी केल्याचे निश्पन्न झाले होते.

त्यामुळे लोकसेविका सुजाता पोहरे यांचे विरूध्द दिनांक 03/07/2025 रोजी लागलीच 15,000/- रू.ची लाच स्वीकृती सापळा कार्यवाही करण्याचा निर्णय सर्वानुमते घेतला.

त्यानंतर पो.नि. श्री.पठाण यांनी सापळा कार्यवाहीचे अनुशंगाने मला, दोन्ही पंचास तसेच सापळा पथकास आवश्यक त्या सुचना दिल्या. तसेच लोकसेविका सुजाता पोहरे यांनी माझेकडुन लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर कोणता ईशारा करायचा ते सांगीतले. त्यानंतर मपोहेकॉ पवार यांनी माझी अंगझडती घेवून लोकसेविका सुजाता पोहरे यांना देण्यासाठी माझेकडील 15,000/- रूपये ज्यात 500 रू. दराच्या 30 चलनी नोटा घेवुन त्यास अँन्थ्रासिन पावडर लावुन माझे जवळील लेडीज पर्सच्या समोरील कप्प्यात ठेवले.

पो.नि. श्री.पठाण यांचे सुचनेवरुन पोकॉ जाधव यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालु करुन मी व पंच क्र. 01 कल्याणपाड असे माझे कार ने सापळा पथक थांबलेल्या ठिकाणा पासून येथून वेळ 16:46 वा. रवाना झालो. मी व पंच क्र. 1 असे समाजकल्याण कार्यालय, नांदेड परिसरातील समतादुत प्रकल्प (बार्टी) येथील लोकसेविका यांचे कक्षात गेलो. तेथे लोकसेविका पोहरे हजर होते. तेंव्हा आम्ही त्यांची भेट घेतली. तेंव्हा लोकसेविका सुजाता पोहरे म्हणाले की, आमच्या जवळ द्या ना, पाच मिनीटात सही करून देते, संध्याकाळी देऊन टाकते, तस आसल तर आताच घेवून जा, तस काहीच नाही, काम नाही, काही नाही, भरवसा नसल तर देऊ नका, पाच-सहा दिवसात करून टाकुत, असे बोलुन माझे जवळील 15,000/-रू.ची लाच रक्कम स्विकारली. त्यानंतर पंच क्र.1 कल्याणपाड यांनी कक्षाबाहेर जाऊन लाच स्विकृतीचा इशारा केल्याने पो.नि.श्री.पठाण, सापळा पथकातील सदस्य व पंच क्र.2 बापुराव नामेवार असे सदर ठिकाणी येऊन श्री.पठाण यांनी त्यांची ओळख सांगीतली. त्यानंतर लोकसेविका सुजाता पोहरे यांना त्यांचे पुर्ण नाव पद व पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव सुजाता मधुकरराव पोहरे वय 50 वर्षे व्य. नोकरी पद जिल्हा प्रकल्प अधिकारी समतादुत प्रकल्प (बार्टी) नांदेड रा. एन.डी. 42 जे-2, 39/6, हडको नांदेड असे सांगितले.

तरी दिनांक 03/07/2025 रोजी लाचमागणी पडताळणी दरम्यान लोकसेविका पोहरे यांचेशी माझे मुलाचे जात पडताळणी संबंधाने चर्चा केली असता तीस हजार रूपयेची मागणी केली, तेंव्हा स्टार्टींग ला किती? असे म्हणाले असता त्यांनी 'स्टार्टींग, एन्ड काही नाही, तुम्ही आता द्या, एक किंवा दोन दिवसात सही करून देतो म्हणायलेत'

असे म्हणून माझेकडे लाचेची मागणी केली. परंतू मी त्यांना विनंती केली की, आता दहा, पंधरा हजार देते व राहीलेले नंतर देते. त्यावर लोकसेविका पोहरे यांनी लाच रक्कम स्विकारण्यास स्विकृती दर्शवली. त्यानंतर सापळा कार्यवाही दरम्यान लोकसेविका सुजाता पोहरे यांनी 'आमच्या जवळ द्या ना, पाच मिनीटात सही करून देतें, संध्याकाळी देऊन टाकते, तस आसल तर आताच घेवून जा, तस काहीच नाही, काम नाही, काही नाही, भरवसा नसल तर देऊ नका, पाच-सहा दिवसात करून टाकुत,' असे बोलुन माझे जवळील 15,000/-रू.ची लाच रक्कमेची अप्रामाणीकपणे स्वतःचे आर्थीक लाभासाठी मागणी करून स्वतः स्विकारली आहे. म्हणून त्यांचे विरूध्द कायदेशीर कारवाई करण्यात यावी यासाठी मी फिर्याद देत आहे.

समक्ष

ही फिर्याद दिली सही

पंच क्रमांक 1 सही

पंच क्रमांक 2 सही

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**
Ganesh Sukdev Chavan(I (Inspector)) / 1234 **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** -पो.नि. पठाण ला.प्र.वि. ACB नांदेड

**Rank (पद):**

**No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**